**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**नागपूर विभागीय मंडळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर-४४०००१**
e-mail:- msboardnagpur@gmail.com www.nagpureduboard.in


पत्र कमांक / नाविमं / पमा / 75
दिनांक : 05 / 01 / 2024

प्रति,

प्राचार्य / मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक विद्यालये / कनिष्ठ महाविद्यालय,
नागपूर विभाग, नागपूर.

विषय :— फेब्रुवारी / मार्च 2024 मध्ये माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ. 10वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. 12वी) परीक्षेस प्रविष्ठ होणा–या जिल्हास्तर, विभागस्तर, राज्यस्तर, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर सहभागी खेळाडू विद्यार्थ्यांना तसेच एन.सी.सी. स्काऊट गाईड मध्ये भाग घेणा–या विद्यार्थ्यांना सवलतीचे वाढीव गुण देण्याबाबत...

संदर्भः—(1) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, क. उमाशि–2015 / प्र.क. 262 / एसडी–2 दिनांक 20 डिसेंबर 2018.
(2) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन शुध्दीपत्रक क. उमाशि 2015 / प्र.क. 262 / एसडी–2 दिनांक 25 जानेवारी 2019.

उपरोक्त संदर्भिय विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते कि, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ. 10वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. 12वी) परीक्षा सन 2024 करीता प्रविष्ठ होणा–या जिल्हास्तर, विभागस्तर, राज्यस्तर, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर सहभागी खेळाडू विद्यार्थ्यांना तसेच एन.सी.सी. स्काऊट गाईड मध्ये भाग घेणा–या विद्यार्थ्यांना सवलतीचे वाढीव गुण देण्याच्या सुधारित कार्यपध्दतीबाबत उपरोक्त शासन निर्णयामध्ये नमुद तरतुदीनुसार संबंधित शाळांनी परीपुर्ण प्रस्ताव विहित नमुन्यात दिनांक 01 / 01 / 2024 ते दिनांक 05 / 04 / 2024 पर्यंत जिल्हा क्रिडा अधिकारी यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे. तसेच उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयाप्रमाणे परीशिष्ट 4 आणि 5 मध्ये नमुद केलेल्या अभिलेखानुसार छाननी करून संबंधित जिल्हा क्रिडा अधिकारी यांनी सदर प्रस्ताव दिनांक 30 / 04 / 2024 पर्यंत नागपूर विभागिय मंडळाकडे सादर करावेत.

कोणताही पात्र विद्यार्थी सदर सवलतीच्या गुणांपासुन वंचित राहणार नाही, याची सर्व शाळाप्रमुखांनी नोंद घ्यावी.

(चिंतामण वंजारी)
विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ,नागपूर.

प्रत माहिती तथा योग्य कार्यवाहीस्तव :—
1) शिक्षणाधिकारी जिल्हा परीषद, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), भंडारा, चंद्रपूर, नागपूर, वर्धा, गडचिरोली, गोंदिया.
2) जिल्हा क्रिडा अधिकारी, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), भंडारा, चंद्रपूर, नागपूर, वर्धा, गडचिरोली, गोंदिया.